‘‘लातूर जिल्ह्यातील ग्रामीण समाजातील सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांची भूमिका : एक समाजशास्त्रीय अभ्यास’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्ये विद्याशाखेअंतर्गत विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या ‘समाजशास्त्र’ विषयातील पदवीकरीता सादर केला जाणारा शोध प्रबंधाचा संशोधन आराखडा

संशोधक

सौ. गिरी माधूरी गोविंद

एम.ए., एम.एड्., एम.फील, सेट (समाजशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. नारायण तु. कांबळे

प्राध्यापक पदवी व पदव्युत्तर

समाजशास्त्र विभाग

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर ताजबंद

ता. अहमदपूर जि. लातूर

संशोधन केंद्र

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डिसेंबर - २०२४

प्रस्तावना :-

प्रस्तूत संशोधन हे लातूर जिल्ह्यातील ग्रामीण समाजातील सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलाची भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन या स्वरुपाचे आहे. प्रस्तुत संशोधन विषयाची भूमिका स्पष्ट करताना ग्रामीण समाजव्यवस्थेतील सामाजिक परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलीस पाटील यांची भूमिका महत्वपूर्ण राहिलेली आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाचा अंमल झाला पर्यायाने कायद्याचे राज्य आले. परंतु ग्रामीण समाजामध्ये कायद्यापेक्षाही तेथील परंपरा, लोकनीती, लोकरुढी या बाबीला विशेष महत्व दिले गेले होते. पर्यायाने अशा घटकांकडून ते समाजाचे नियंत्रण केले जात होते. परंतु स्वातंत्र्यानंतर हे या अनौपचारिक नियंत्रणाचे महत्व कमी होऊ लागले. त्याकरिता संहिता पालन करण्याचे सुरु झाले. ग्रामीण समाजव्यवस्थेतील लोकांना कायद्याचे फारसे काही देणं-घेणं नाही अशा अविर्भावात लोक वर्तन करीत असत. तेंव्हा अशा लोक वर्तनाला कायद्याची नियंत्रण व्यवस्था निर्माण केली. विशेषतः याची गावपातळीवर अंमलबजावणी करुन घेण्याकरीता मध्यस्थाची भूमिका पोलीस पाटील याना पार पाडावी लागत होती. ग्रामीण समाजव्यवस्थेत सुशांतता प्रस्थापित करण्याकरिता पोलीस पाटील हा महत्वाचा घटक समजला जावू लागला. परंतु संशोधनात्मक दृष्टीने हा घटक दुर्लक्षित राहिला आहे. तेंव्हा या भूमिकेचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे.

समाजात कायदा आणि सुव्यवस्था राखणे याबाबतीत पोलीसासोबतच पोलीस पाटील याची भूमिकादेखील महत्वपूर्ण आहे. विशेष पोलीस पाटील या भूमिकेत प्रामुख्याने पुरुषाचा समावेश अधिक आहे. पोलीस प्रशासनाच्या वेगवेगळ्या स्तरावर मदत करण्याकरीता पोलीस पाटील हा महत्वाचा दुवा मानला गेला आहे. पोलीस पाटील हे ग्रामीण समाजव्यवस्थेला व गावपातळीवरील गुन्हेगाराना नियंत्रित करण्याच्या बाबतीत आणि शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यात त्यांचे महत्वपूर्ण योगदान केल्याचे आढळते.

एकूणच पोलीस पाटलांच्या बाबतीत शासन पातळीवर म्हणावी तशी सकारात्मक अभिवृत्ती दिसून येत नाही. या व्यतिरिक्त पोलीस पाटील जिथे गावपातळीवर काम करतात त्याठिकाणी त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अभ्यासकांनी त्या बाबीकडे तेवढे गंभीरपूर्वक लक्ष दिलेले नाही वा त्या विषयावर तेवढ्या प्रमाणात संशोधन झालेले नाही.

समाजाच्या हिताकरीता व्यक्तीच्या सुप्त इच्छा, ध्येय व ते साध्य करण्याच्या मार्गावर मुरड घालण्याची आवश्यकता असते. ग्रामीण समाजव्यवस्थेत व्यक्ती स्वातंत्र्यावर रुढी परंपरा, नीतिमुल्य आदर्श लोकाचार, प्रमाणके इत्यादीच्या प्रभावामुळे लोकांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवता येते. या सर्व सामाजिक शक्तीचा असा प्रभाव आहे की, समाजातील सर्व व्यक्ती एकाच नियमांच्या माध्यमातून वर्तन करताना दिसतात. समाजाचा विकास स्थैर्य व अस्तित्व या तिन्ही बाबी व्यक्तीमधील संबंधाची स्थिरता व अस्तित्व यावरच अवलंबून असतात. मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजाशिवाय राहूच शकत नाही. त्यामुळे त्यांचे जीवन समाजाद्वारेच नियंत्रित केले जाते. ज्यातून सामाजीकरण व्हावे व व्यक्तीने समाजविरोधी कार्य करु नये व पर्यायाने विपथगमन करु नये हा मुख्य हेतू असतो.

अशाच प्रकारचा नियंत्रणाचा एक प्रभावी घटक म्हणून ग्रामीण समाजामध्ये आढळून येतो व तो म्हणजे पोलीस पाटील या घटकाला ग्रामीण जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. पोलीस पाटील या भूमिकेला फार मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. आजपर्यंतच्या इतिहासामध्ये पोलीस पाटलाने ग्रामीण समाजव्यवस्थेमध्ये आपला ठसा उमटवलेला आहे. महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम १९६७ चा अधिनियम क्रमांक ८६ अन्वये पोलीस पाटील गावपातळीवर कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशान्वये कार्य करीत असतात. गावपातळीवरील जी माहिती व पत्रके मागवतील ती पुरवणे गावातील अपराधाचे प्रमाण व समाजस्वास्थ्य याबाबत माहिती पुरविणे, गावच्या हद्दीत गुन्हा घडू नये व लोकांना उपद्रव होवू नये म्हणून बंदोबस्त करणे व आपल्या हद्दीतील गुन्हेगारांचा शोध घेवून न्यायालयासमोर हजर करण्यास मदत करणे इत्यादी कामे पोलीस पाटील करतात.

संशोधन विषयाची मध्यवर्ती कल्पना ही आहे की, पोलीस पाटील यांची भूमिका अशी आहे की, गावाचा कारभार सांभाळण्यासाठी गावप्रमुखाची जशी महत्वाची भूमिका आहे. तशा प्रकारे पोलीस पाटील या पदाची भूमिका देखील महत्वाची आहे. समाजातील कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच सामाजिक समस्या सोडवणूक करणे महत्वाचे मानले आहे. या पदावर सहसा कर्तृत्ववान, शूर, धाडसी व्यक्तीच असायची. त्यांच्या न्यायपूर्वक वर्तणूकीमुळे अनेक पाटील हे इतिहासात अमर झाले आहेत. या भूमिकेची थोडक्यात अशी ही पार्श्वभूमी आहे. तेंव्हा या पोलीस पाटील या भूमिकेचा आजच्या समकालीन समाजव्यवस्थेत त्याचे स्थान काय राहिले आहे हे अभ्यासण्याबरोबरच त्याची आजची भूमिका कितपत महत्वाची आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न असणार आहे. समकालीन समाजव्यवस्थेत या पोलीस पाटील या भूमिकेत कोणत्या स्वरुपात बदल झाले आहे सोबतच ग्रामीण समाजव्यवस्थेत सामाजिक नियंत्रण ठेवण्यात पोलीस पाटील यांनी कोणत्या स्वरुपाची भूमिका घेतली आहे ही संशोधनाची केंद्रवर्ती कल्पना आहे.

विषय निवडी मागील भूमिका :

ग्रामीण समाजात सामाजिक नियंत्रणाची भूमिका ही कायदा, परंपरा, मूल्ये व संस्कृतीच्या माध्यमातून पार पाडली जाते. सर्वसाधारणपणे ग्रामीण समाजात हे सर्व असून ही गावपातळीवर बरेच तंटे, भांडणे,, कलह निर्माण होतात. हे होऊ नये यासाठी पोलीस आणि गावकरी यांच्यातील दुवा म्हणून ‘पोलीस पाटील’ यांना ही कर्तव्ये पार पाडावी लागतात. हे कार्य तसे जिकरीचे आहे. तेंव्हा अशा परिस्थितीत ग्रामीण भागात पोलीस पाटील महत्वाची भूमिका पार पाडतात. परंतु तसे ते दुर्लक्षित असतात. तेंव्हा यांच्या कार्याचे व भूमिकेचे समाजाला निट आकलन झाले पाहिजे. त्यांच्या भूमिकेचा समाजाला कोणत्या दृष्टिकोनातून फायदा आहे. या सर्व बाबीचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास झाला पाहिजे. या अनुषंगाने कांही विधायक सुचना करता आल्या तर योग्यच होईल. हाच या संशोधनामागील मुख्य हेतू आहे. त्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाचे मर्यादीत वस्तुनिष्ठ स्वरुपात संशोधन होण्यासाठी प्रस्तुत

संशोधन विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

ग्रामीण सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांची भूमिका समजून घेणे हा प्रस्तुत संशोधनाचा मुख्य हेतू आहे. हा हेतू साध्य करण्याच्या अनुषंगाने खालील उद्दिष्टांची मांडणी केलेली आहे.

१) ग्रामीण सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

२) पोलीस पाटलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

३) पोलीस पाटलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक चलांशी असलेले सहसंबंध अभ्यासणे.

४) पोलीस पाटलांच्या कामाच्या ठिकाणी व कामाच्या माध्यमातून अनुभवास येणाऱ्या समस्या जाणून घेणे.

५) पोलीस स्टेशन व गावातील लोक यांच्यातील समन्वयक म्हणून भूमिका तपासणे आणि पोलीस पाटलांच्या योगदानाचे महत्व अभ्यासणे.

७) पोलीस पाटलांना ग्रामीण समाजात नियंत्रणात येणाऱ्या समस्या व त्यावरील निर्मुलनाचे अध्ययन करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये :

१) ग्रामीण सामाजिक नियंत्रणामध्ये पोलीस पाटलांची भूमिका निर्णायक आहे.

२) वर्तमानकाळात पोलीस पाटलांच्या भूमिका, दर्जा व अधिकारात बदल होत आहे.

३) पोलीस पाटलांना ग्रामीण, सामाजिक नियंत्रणात विविध समस्या येतात आणि या समस्यांवर उपाययोजना मांडणे गरजेचे आहे.

४) पोलीस पाटील सुशिक्षित असलेले दिसून येतात.

५) सामाजिक नियंत्रणात पोलीस पाटलाची भूमिका महत्वाची राहीलेली आहे.

६) पोलीस यंत्रणेसाठी समन्वयक ही भूमिका आणि पोलीस पाटलांचे सामाजिक नियंत्रणासाठी योगदान महत्वाचे राहीलेले आहे.

संशोधनाचे विश्व :

संशोधनाच्या सोयीसाठी महाराष्ट्रातील एक महत्वाचा जिल्हा आहे. लातूर जिल्ह्यातील ग्रामीण समाजातील सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांच्या भूमिकेच्या अनुषंगाने हे संशोधन आहे. या संशोधनाचे कार्यक्षेत्र संशोधनाच्या दृष्टीने लातूर जिल्ह्यापूरतेच मर्यादीत आहे.

संबंधित साहित्याचा आढावा :

प्रस्तुत संशोधन विषयच्या अनुषंगाने होणाऱ्या संशोधनाला योग्य दिशा प्राप्त होण्यासाठी ग्रामीण नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांची भूमिकेच्या अनुषंगाने जे अभ्यास झाले आहेत त्यातील काही उपलब्ध संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे.

१) काळदाते सुधा व गोटे शुभांगी (१९९७) यांनी भारतातील गुन्हेगारी समाजशास्त्र या ग्रंथात समाजव्यवस्थेतील गुन्हेगारीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी पोलीसांच्या भूमिकेचेही सविस्तर चर्चा केली आहे सोबतच त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न केला आहे.

२) बोराडे नारायण (२००३) यांनी सामाजिक नियंत्रणात पोलीसांची भूमिका या विषयावर डॉ. बा.आं.म.विद्यापीठात संशोधन केले आहे. त्यामध्ये पोलीस या शब्दाची उत्पत्ती सांगून पोलीस ही संकल्पना स्पष्ट केली आहे. प्राचीन, मध्ययुगीन आधी आधुनिक काळातील पोलीस प्रशासनाचा विकासाची मांडणी शास्त्रीय पद्धतीने केली आहे.

३) रितेश कुमार (१९९९) विशेष पोलीस निरीक्षक यांनी जालना जिल्ह्याच्या संदर्भात पोलीस पाटील मार्गदर्शिका हे पुस्तक प्रकाशित केले आहे. सदरील पुस्तकामध्ये पोलीस पाटलांविषयक कायदे आणि पोलीस पाटलांनी करावयाची कर्तव्ये अशा बाबीची प्रस्तुत पुस्तकातून चर्चा केली आहे. शेवटी पोलीस पाटलांना त्यांच्या कार्याविषयी मार्गदर्शक ठरावे या हेतूनेच या पुस्तकाची निर्मिती केली आहे.

४) चांदे एम.बी. (२०००): यांनी भारतातील पोलीस या प्रस्तुत ग्रंथामध्ये पोलीस प्रशासनाच्या ऐतिहासिक आढावा घेवून भारतातील पोलीस दलासंबंधीची शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यासपूर्ण माहिती स्पष्ट केली आहे.

५) ढगे, कैलास धोंडिबा (२००७) : यांनी कायदा व सुव्यवस्थेत पोलीस प्रशासनाची भूमिका या विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे एम. फीलचा लघु शोधप्रबंध सादर केलेला आहे. प्रस्तुत लघुशोध प्रबंधामध्ये त्यांनी मुंबई पोलीस अधिनियम पोलीस शक्ती, त्यांचे निष्कर्ष व पोलीस प्रशासनाच्या भूमिकेची वस्तुनिष्ठपणे मांडणी केली आहे.

६) पिंपळे, बाळासाहेब (२००४) : यांनी महाराष्ट्रातील पोलीस प्रशासन या विषयावर संशोधन केले आहे. प्रस्तुत संशोधनात पोलीस प्रशासनाची ऐतिहासिक पार्श्वभूमीची मांडणी केली आहे. पोलीस प्रशासनाचा विकास, पोलीस, पोलीस प्रशासनाची संरचना, पोलीस भरती, पोलीस प्रशासन केंद्रे यांची शास्त्रीय पद्धतीने मांडणी केली आहे.

७) गायकवाड, जयश्री गिरिधारी (२०१५) : यांनी महाराष्ट्रातील महिला पोलीसांची स्थिती आणि भूमिका विशेष संदर्भ : औरंगाबाद जिल्हा या विषयावर सादर केलेल्या शोधप्रबंधात औरंगाबाद जिल्ह्यातील महिला पोलीसाच्या प्रशासकीय भूमिकेचा, त्यांच्या हितार्थ असणाऱ्या विविध योजनांचा, त्यांच्या बाबतीतचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन आणि प्रशिक्षण अभावाची कारणे अभ्यासली आहेत. यावर कांही महत्वपूर्ण निष्कर्षही नोंदविले आहेत.

संशोधन विषयाचे महत्त्व :

प्रस्तुत संशोधन लातूर जिल्ह्यातील सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलाची 'भूमिका' हा विषय अध्ययनासाठी घेतला आहे. ग्रामीण समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था राखणे, तसेच सुयोग्य नियोजन करणे, नागरिकांमध्ये भयमुक्त वातावरण निर्माण व्हावे, पोलीस यंत्रणा सक्षम राहावी यासाठी जनता व पोलीस यामधील समन्वय साधण्याकरिता पोलीस पाटील हा घटक अत्यंत महत्वाचा दुवा मानला आहे. पोलीस पाटील त्यांच्यामुळे

गावपातळीवरील खऱ्या गुन्ह्याची उकल करण्यासाठी मदत होत आहे. कायदा व सुव्यवस्था जातीय सलोखा राखण्याच्या दृष्टिने गावातील घडणाऱ्या सर्व घटना यांचा समन्वय साधण्याकरीता पोलीस पाटलाच्या कार्याचा व भूमिकेचा इतिहास महत्वाचा राहिलेला आहे. परंतु अभ्यासाच्या दृष्टिकोनातून तसा तो दुर्लक्षित राहिलेला आहे. अशा दुर्लक्षित राहिलेल्या पैलूवर संशोधनात्मक दृष्टिकोनातून अभ्यास केला जाणार आहे. पोलीस पाटील या भूमिकेचा ग्रामीण सामाजिक नियंत्रणात असलेले योगदानाची वास्तव स्थिती समाजासमोर आणणे व त्यावर उपाय सुचविणे हे या संशोधनाचे उद्दिष्ट असल्याने सदरील संशोधन विषयाचे हे वेगळेपण असणार आहे. म्हणून या संशोधनाला वेगळे महत्व असणार आहे. विशेषतः मराठवाड्यातील लातूर जिल्ह्याच्या अनुषंगाने पोलीस पाटलाच्या भूमिकेचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास अद्यापही केला गेला नाही. लातूर जिल्ह्यातील ग्रामीण समाज नियंत्रणात असलेल्या भूमिकेची व योगदानाची जाणीव व्हावी या उद्देशातून हे संशोधन दिशादर्शक ठरणार आहे. त्यामुळे या संशोधनाला वेगळे महत्व असणार आहे.

वरील संशोधन विषयाची मांडणी शास्त्रीय पद्धतीने होण्याकरिता प्रस्तुत संशोधन विषयाची निश्चित कांही उद्दिष्ट्ये असावी लागतात ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा लातूर जिल्ह्यातील ग्रामीण, सामाजिक नियंत्रणात पोलीस पाटलांची भूमिका एक समाजशास्त्रीय अभ्यास या विषयाचे संशोधन केले जाणार आहे. हे संशोधन ग्रामीण भागातील पोलीस पाटलांच्या कार्याविषयीच मर्यादीत आहे. ग्रामीण भागातील संबंधित घटक आणि पोलीस पाटलांची सामाजिक नियंत्रणातील भूमिका ही संशोधनाची व्याप्ती आहे.

संशोधनाच्या मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे लातूर जिल्ह्यातील ग्रामीण सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांच्या भूमिकेचा अभ्यास करण्यात आला आहे. सदरीलसंशोधन हे लातूर जिल्ह्यापुरते

मर्यादीत आहे. सदरीलसंशोधन फक्त लातूर जिल्ह्यातील पोलीस पाटील यांची ग्रामीण सामाजिक नियंत्रणात असलेली भूमिका आणि योगदानाशी निगडीत आहे.

संशोधन पद्धती :

कोणत्याही प्रकारचे संशोधन करीत असताना संशोधकास नेहमीच शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करावा लागतो. ज्यामुळे संशोधनास शास्त्रीय चौकट प्राप्त होते. यातूनच संशोधनास अचूक शास्त्रीय पद्धतीच्या आधारे काढलेले निष्कर्ष शास्त्राला मान्य असतात. संशोधनाविषयीची सत्यता व वस्तुनिष्ठता तपासण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा व दुय्यम तथ्य सर्वेक्षण संशोधन आराखडा इत्यादीचा वापर केला जाणार आहे.

संशोधन आराखडा :

लातूर जिल्ह्यातील सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांची भूमिका एक समाजशास्त्रीय अभ्यास या संशोधन विषयाच्या अभ्यासाकरीता अन्वेषणात्मक संशोधन आराखडा व वर्णनात्मक संशोधन आराखडा या दोन्ही संशोधन आराखड्याचा वापर केला जाईल. अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याच्या आधारे संशोधन विषयाच्या संबंधित ज्या काही समस्या आहेत त्यां कारणाचा शोध घेता येतो. वर्णनात्मक संशोधन आराखड्यामुळे संशोधन विषयाच्या वास्तविकतेचे व वस्तुनिष्ठतेचे वर्णन करता येते. हे संशोधन लवचिक असल्यामुळे वेळोवेळी याच्यात बदल करण्यात येईल.

नमुना निवड पद्धती :

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा 'लातूर' जिल्ह्यातील सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन प्रस्तुत अभ्यासाचे कार्यक्षेत्र लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यापूरते मर्यादीत आहे. या जिल्ह्यात येणाऱ्या १० तालुक्यामधून ५० पोलीस, २०० सर्वसामान्य जनता व २०० पोलीस पाटील यांची उत्तरदाते म्हणून निवड केली जाणार आहे. संशोधनाकरीता नमुना निवडताना सहेतूक व सोयीस्कर नमुना निवड पद्धतीचाही उपयोग केला जाणार आहे.

प्रस्तुत अभ्यासाच्या अध्ययनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब केलेला आहे.

तथ्य संकलनासाठी प्राथमिक तथ्य व दुय्यम अशा दोन्ही स्त्रोतांचा वा साधनाचा वापर करण्यात आलेला आहे. प्राथमिक स्त्रोतात पोलीस पाटील यांच्याकडून माहिती संकलन करण्यासाठी मुलाखत अनुसूचीचा अवलंब करण्यात येणार आहे. मुलाखत अनुसूचीच्या साधनाशिवाय अध्ययनकर्त्याच्या प्रत्यक्ष सहभागी निरीक्षणाद्वारे तथ्य संकलीत केले जाणार आहेत.

प्राथमिक तथ्यांना अधिक विश्वसनीय व प्रमाणित करण्यासाठी व पृष्ठ्यार्थ विषयासंबंधी उपलब्ध प्रकाशित व अप्रकाशित साहित्याचा ही विचार करण्यात येणार आहे. त्यात शासकीय पातळीवरील माहिती जसे की, जनगणना अहवाल, विविध शासकीय अहवाल, शासकीय कार्यालयातून मिळविलेली माहिती तसेच वेगवेगळी संपादीत ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेख, संशोधन प्रबंध, आणि इंटरनेटवरील उपलब्ध माहितीचा वापर केला जाणार आहे.

तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन :

संशोधकाला तथ्याच्या वर्गीकरणानंतर संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन केले जाईल. हा संशोधनातील महत्वाचा पाया आहे. मुलाखत अनुसूचीच्या आधारे तथ्य संकलीत केल्यानंतर त्यांचे सांकेतिकरण करण्यात येईल.

प्राथमिक स्त्रोत :

प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित माहिती संकलीत करण्यासाठी प्राथमिक तथ्यतंत्रातील निरीक्षण, मुलाखती, अनुसूची या तंत्राचा उपयोग केला जातो. या तंत्राच्या साह्याने नमुन्यातील पोलीस पाटील या भूमिकेतील स्त्री-पुरुष यांच्या सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, वैवाहिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय स्थितीच्या संदर्भात माहिती

संकलित केली जाईल. या संशोधन विषयाच्या संबंधित व व्यक्तीशी प्रत्यक्ष भेट देवून अनुसूची मुलाखत घेतली जाईल.

द्वितीयक स्त्रोत :

द्वितीयक स्त्रोतामध्ये प्रकाशित साहित्याचा समावेश होतो. संबंधित संशोधन विषयाच्या अभ्यासाकरीता द्वितीय तथ्य संकलन स्त्रोताच्या आधारे विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, आत्मकथने सरकारचे प्रकाशित अहवाल, मासिके, दैनिके, पाक्षिके, नियतकालिके, स्वैच्छिक संघटनाचे अहवाल प्रकाशित व अप्रकाशित संशोधन प्रबंध इत्यादीचा वापर केला जाईल.

संशोधनाचा सैद्धांतिक दृष्टिकोन :

कोणत्याही संशोधनाला त्या मुळ विषयाची संदर्भ चौकट असणे अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे संशोधनाला संबंधित विषयाचा आधार व शास्त्रीयता प्राप्त होण्यास मदत मिळते. प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे व गृहितकाच्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनासाठी संरचनात्मक कार्यवाद या समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा आधार घेण्यात आला आहे.

संरचनात्मक कार्यवाद हा Macro theory म्हणून ओळखला जातो. समाजातील विविध संरचना किंवा संस्था समाजाचे कार्य करीत असतात. या मुळ अर्थावर संरचनात्मक कार्यवाद आधारीत आहे. या विविध संरचना किंवा संस्थामध्ये कायदा व्यवस्था, कुटुंब संस्था, धर्म संस्था इ. संस्थाचा समावेश होतो. या संस्था समाजाचे अस्तित्व टिकून राहावे यासाठी योगदानात्मक स्वरुपाचे कार्य करीत असतात. या कार्यातूनच समाजाचे अस्तित्व टिकून राहते. यापैकी एकाही संस्थेच्या योगदानात्मक स्वरुपात बिघाड झाल्यास याचे परिणाम समाजव्यवस्थेवर किंवा समाजव्यवस्थेतील घटकांवर होत असतात. कायदा व्यवस्थेतील बिघाडामुळे समाजघटकाचे सामाजिक व कायदा व्यवस्था प्रभावित होऊ शकतात म्हणून याकरीता गावपातळीवर देखील सामाजिक नियंत्रण करणारे कांही प्रभावी घटक वा भूमिका आहेत. त्यामध्ये पोलीस पाटील हा महत्वाचा घटक आहे. समाजातील नियंत्रण व्यवस्था कोलमडली तर त्याचे परिणाम समाजावर होऊ शकतात. या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनाच्या

अनुषंगाने संरचनात्मक कार्यवाद हा समाजशास्त्रीय दृष्टीकोन विचारात घेण्यात आला आहे. सोबतच प्रस्तुत संशोधन विषयास अनुसरुन सामाजिक नियंत्रण याबाबत फेअर चाइल्ड, मॅक आयव्हर, आणि वॉलेस, दुरखाईम यांनी सामाजिक नियंत्रणातील महत्वाच्या घटका संबंधीचा मांडलेला सिद्धांत सदर संशोधनासाठी सैद्धांतिक दृष्टीकोन म्हणून उपयोगात आणला जाणार आहे.

प्रकरणाची मांडणी :

संकलीत तथ्याचे वर्णन, विश्लेषण व अन्वयार्थ स्पष्टतेसाठी खालील पाच प्रकरणामध्ये संशोधन प्रबंधाची मांडणी करण्यात आलेली आहे ती पुढीलप्रमाणे-

प्रकरण १ ले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये सामाजिक नियंत्रणातही समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही संकल्पना स्पष्ट करुन या संबंधित काही महत्वाच्या घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे. सामाजिक व्यवस्थेत पोलीस पाटील या शब्दाचा अर्थ स्पष्ट करुन प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक कालखंडातील पोलीस पाटलांचे स्थान तसेच ग्रामीण सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांची भूमिका इत्यादीची समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मांडणी केली जाणार आहे.

प्रकरण २ रे : संशोधन पद्धती व संबंधित साहित्याचा आढावा :

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन क्षेत्राचे अध्ययन करण्यात येणार आहे. लातूर जिल्ह्याच्या संदर्भातील सर्वसाधारण माहिती जिल्ह्याचे क्षेत्रफळ व प्रशासन विभाग, जिल्ह्याची लोकसंख्या त्याचे साक्षरतेचे प्रमाण, जिल्ह्यातील पोलीस ठाणे, गुन्ह्याचे स्वरुप, न्यायालयीन माहिती ग्रामीण पातळीवरील गुन्ह्याचे स्वरुप व माहिती इत्यादी बाबत अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच संशोधनाचा विषय, विषयाची आवश्यकता, उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये, तथ्यसंकलन, संशोधन विषयाची व्याप्ती, मर्यादा, पृथ्थःकरण संशोधनाचा आराखडा इत्यादी बाबीचा प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास करण्यात येणार आहे. प्रस्तुत प्रकरणात संबंधित विषयाच्या अनुषंगाने संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण ३ रे : पोलीस पाटलांची कौटुंबिक शैक्षणिक व आर्थिक स्थिती :

प्रस्तुत प्रकरणामध्ये ग्रामीण व शहरी भागातील पोलीस पाटलांच्या कौटुंबिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे. सोबतच स्वातंत्र्यपूर्व काळात पोलीस पाटलांच्या भूमिकेचे व अधिकाराचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच पोलीस, पोलीस पाटील, सामान्य जनता यांच्या भूमिकेचे अध्ययन तसेच पोलीस पाटलांची सामाजिक नियंत्रणातील भूमिका इत्यादी बाबीचा प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ४ थे : सामाजिक नियंत्रणात पोलीस पाटलाची भूमिका

प्रस्तुत प्रकरणात पोलीस पाटलांच्या भूमिकेविषयी व कार्य पद्धतीविषयीची समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मांडणी केली जाईल. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि वर्तमानकाळातील पोलीस पाटलांच्या भूमिकेतील बदलाचे अध्ययन करण्यात येईल. तसेच तथ्य संकलनासाठी जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता, पोलीस, पोलीस पाटील यांच्या मुलाखती घेण्यात येतील. पोलीस पाटलांची भूमिका व कार्य पद्धतीच्या दृष्टिकोनातून त्यांच्या असलेल्या योगदानाचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे. तसेच पोलीस पाटील व पोलीस यंत्रणा व गावकरी यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ५ वे : निष्कर्ष व शिफारशी

संशोधन प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये प्रश्नावली व मुलाखतीच्या साह्याने संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे निष्कर्ष त्या अनुषंगाने काही शिफारशीची मांडणी केली जाईल.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) जोशी व. शं. (२०११-१२) : महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम १९६७, रमा जाधव.

२) अहिरे, प्रतिभा (१९९७) - ग्रामीण समाजशास्त्र, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद.

३) चांदे, एस. बी. (२००८) - भारतातील पोलीस, सुमती पब्लिकेशन.

४) घाटोळे, रा. ना. (१९९२) - समाजशास्त्र तत्त्वे आणि पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

५) आगलावे, प्रदिप (२००७) - सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन, सुधारीत आवृत्ती.

६) कुलकर्णी, चारुशिला - पोलीस पाटील यांची भूमिका महत्वपूर्ण (लोकसत्ता वृत्तपत्र) नाशिक ३ जानेवारी २०१४.

७) कुलकर्णी, एस. बी, खणके विष्णु (२०१६) - महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, अशोक ग्रोवर अँड कंपनी, लॉ बुक सेलर्स अँड पब्लिशर्स, पुणे.

८) काळदाते, सुधा, गोटे शुभांगी (२००६) - गुन्हेगारीचे समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

९) पाटील, भिकाजी - पोलीस पाटील मार्गदर्शिका, (२०१४).

१०) बोराडे, नारायण (२०१५) सामाजिक नियंत्रणात पोलीसांची भूमिका.

११) जाधव, विठ्ठल एन. (२००१) पोलीस अधिक्षक परभणी, पोलीस पाटील मार्गदर्शिका.

१२) मुळे, कमल, विश्वनाथ जोशी, वसंत देशपांडे (१९७६) (संपा.) भारतीय खेडी व जाती विचार प्रकाशन, औरंगाबाद.

१३) चव्हाण, ज्ञानेश्वर, पोलीस अधिक्षक, लातूर (निर्भया) महिला संबंधीचे कायदे व अधिनियम.

१४) वर्मा, ब्रिजमोहन (१९६२), भारतीय पोलीस, न्यु पब्लिकेशन, नवी दिल्ली.

१५) इंगळे, उत्तम लक्ष्मणराव (२००७), महाराष्ट्रातील पोलीस जनता संबंध अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, लोकप्रशासन विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

१६) गायकवाड, जयश्री गिरिधारी (२०१५), महाराष्ट्रातील महिला पोलीसांची स्थिती आणि भूमिका विशेष संदर्भ, औरंगाबाद जिल्हा अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध औरंगाबाद डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

१७) स्वामी, व्ही. एन. (१९९८), पोलीस पाटील भरती संपूर्ण मार्गदर्शक, विद्याभारती प्रकाशन, लातूर.

१८) व्होरा, राजेंद्र आणि पळशीकर, सुहास (संपा.) (२०१०), भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स.

१९) लोटे, रा. ज. (२००९), भारतीय समाज आव्हाने आणि समस्या, नागपूर : पिंपळापूरे पब्लिशर्स.

२०) कछल, दिपीका (मुख्य संपा.) - जुलै २०१७ : योजना मासिक, नवी मुंबई, केंद्रिय सदन, सी.बी.डी. बेलापूर.

२१) मोकाशी, मधुकर (२००४), पोलीस समाज आणि शासन, पुणे स्नेहवर्धन प्रकाशन.

संशोधक

सौ.गिरी माधूरी गोविंद
एम.ए., एम.एड्., एम.फील,
सेट (समाजशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. नारायण तु. कांबळे
प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर ताजबंद
ता. अहमदपूर जि. लातूर